# निधीसाठी मेट्रो ३ ला स्थानकांच्या आसपासच्या जागांचा पर्याय

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

खाजगी कंपन्यांना स्थानकांच्या नावाचे ब्रँडिंग करण्याची संधी देऊन त्या माध्यमातून निधी उभा करण्याचे पाऊल उचलणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन आता पाच स्थानकांच्या आसपासच्या जागेच्या विक्रीतून आणखी निधी उभारणार आहे.निधी उभारण्याच्या दृष्टीने या जागांचा कशा पद्धतीने विकास करता येईल,याची चाचपणी करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती केली जाणार आहे.

आरेतील कारडेपोच्या वादामुळे मेट्रो ३ प्रकल्पाचे आर्थिक गणित बिघडले आहे.या प्रकल्पाचा खर्च जवळपास १० हजार कोटीने वाढला आहे.या प्रकल्पासाठी मेट्रो ३ ने जपानच्या जायका या वित्तसंस्थेकडून मोठ्या रकमेचे कर्ज घेतले आहे. मात्र प्रकल्प खर्च वाढल्याने आणखी निधीची तरतूद करावी लागणार आहे.

याशिवाय हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर मेट्रो चालवण्याचा दैनंदिन खर्च तसेच अन्य बाबींवर मोठा खर्च होणार आहे.फक्त तिकीट विक्रीतून हा खर्च भरून काढता येणार नाही.त्यामुळे महसुलाचे विविध स्रोत धुंडाळले जात आहेत.याचाच एक भाग म्हणून पाच स्थानकांच्या आसपासच्या जागेतून पैसे उभारण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.एमआयडीसी स्थानकालगतची ४५८६ चौरस मीटर, धारावी स्थानक ४२० चौ. मी.,मरोळ नाका ८९५ चौ. मी.,महालक्ष्मी ३५१५ चौ. मी. आणि नयानगर ३२७८ चौ. मी. एवढी जागा उपलब्ध आहे.या जागेचा व्यावसायिक किंवा निवासी वापरासाठी करता येईल का,त्यामाध्यमातून निधी उभारता येईल का,असे प्रयत्न आहेत.त्यासाठी सल्लागाराची नियुक्ती केली जाणार आहे.

याआधी मेट्रो ३ ने स्थानकांच्या नावाचे ब्रँडिंग सुरू केले आहे.त्यासाठी खाजगी कंपन्यांना अधिकार देण्यात आले आहेत.त्यामाध्यमातून वर्षाला ३०० कोटी रुपयांचा महसूल अपेक्षित आहे.